# प्रगत अध्ययन संस्थेच्या विद्यार्थ्यांची सागर उपवन भेट

२०१९ या वर्षाची सांगता एका वेगळ्या उपक्रमाने केली . विद्या प्रसारक मंडळाच्या प्रगत अध्ययन केंद्राने लँडस्केप व गार्डनींगच्या विद्यार्थ्यांना या करता सागर उद्यानात नेण्याचे ठरवले व २९ डिसेंबर २०१९ रोजी हे विद्यार्थी त्यांच्या शिक्षिका डॉ.सौ.बोरकर व डॉ.सौ.अलका भागवत यांच्याबरोबर सागर उद्यानास भेट देण्यास गेले व तेथील उद्यानाची आगळी वेगळी सहल अनुभवली.

**कुलाबा बस डेपो येथील भल्या मोठ्या कचरा कुंडीचे उपवना मध्ये रूपांतर करण्याचा महत्वाचा निर्णय मुंबई पोर्ट ट्रस्ट ने घेतला व ही १२ एकर जागा ताब्यात घेतली व** WWF **(वर्ल्ड वाइल्ड लाईफ ) च्या मदतीने हे काम पूर्णत्वास नेले. साल २००० च्या सुमारास ह्या कामाला सुरवात झाली. गेली १९ वर्षे हे उपवन आहे त्यामुळेच तिथली झाडे ही उंचच उंच आकाशाला गवसणी घातल्या सारखी आहेत. ह्या सुंदर उपवनात प्रवेश घेण्यासाठी च शुल्क आहे रु २ फक्त मात्र मूवी कॅमेरा असल्यास रु. ५००. एका बाजूला अरबी समुद्राने वेढल्यामुळे ह्याचे सागर उपवन हे नाव समर्पक आहे. ह्या बाजूला अनेक स्थानिक व स्थलांतरित पक्षी पाहावयास मिळतात. उत्तम असल्या कारणानें उपवनास अनेक वेळा पुरस्कारही मिळाले आहेत.**

**प्रवेश केल्या बरोबर आत मध्ये अनेक जॉगर्स पाथवे दिसून येतात. पाथवे असल्यामुळे ज्येष्ठ नागरिक त्यांच्या स्वयंचलित खुर्चीवर बसून फेरफटका मारू शकतात. निसर्गाचा आनंद घेण्यासाठी मोक्याच्या ठिकाणी बाक आहेत ज्यावर बसून निवांतपणे लोक स्वच्छ हवेत दीर्घ श्वास घेताना ही दिसतात. सलामीलाच आहे उंच ट्रॅव्हलर्स पाम. पाम संबोधिले तरी हा पाम कुळातील नाही. त्याच्या बरोबरीने आहे सीता अशोक. ह्याची कोवळी पाने अतिशय नाजूक व फिक्या गुलाबी रंगाची असतात. लाल केशरी फुलांचे गुच्छ तर अप्रतिम. त्याच्या पुढेच दिसून येतो पाम्स चा विभाग येथे सर्व पाम्स आहेत. भेरली माड त्याच्या फळांच्या माळांसकट खूपच उठून दिसतो. बहुतेक पाम्सना शाखा विन्यास नसतो परंतु**

एकमेव व्दिभाजीत शाखा असलेला पाम *Hyphaene dichotoma* येथे पाहावयास मिळतो. ह्याच्या खोडावरील छद पर्णाधार विणलेल्या चटई सारखे दिसतात. ह्या विभागाच्या कुंपणावर आहे सागर गोट्याचा काटेरी वेल . इथल्या समुद्र फळाच्या झाडाच्या फुलांचा सडा पडतो ते दृश्य खूपच संदर दिसते. येथील फायकस विभागही खूप मोठा आहे. द्रोण सारखी पाने असलेला फायकस कृष्णीं येथे पाहावयास मिळतो. वड ,पिंपळ, उंबर तर आहेतच. वृक्ष मोठे असल्यामुळे हे पाहताना मान सतत मागच्या बाजूला काट कोनात वाकवावी लागते. जिथे जिथे उंच झाडे आहेत त्या परिसरात जमिनीवर काहीच तण उगवत नाही . कारण ह्या मोठ्या वृक्षांना विपुल फांद्या आणि भरपूर पर्ण संभार त्यामुळे जमिनी पर्यंत सूर्य प्रकाश पोहोचू शकत नाही. काचेच्या खोलीत बंदिस्त येथे वेगवेगळ्या प्रकारचे निवडुंग पाहावयास मिळतात. अगदी लहान काही से . मी . उंचीचे तर काही ६ते ७ फूट उंच. काही निवडुंगांना सुरेख फुले ही येतात.
इथली अनेक दुर्मिळ झाडे पाहण्यास २ तास ही अपुरे पडतात. आत मध्ये आल्यावर जी प्रसन्नता जाणवते ती बाहेर पडल्यावरही कायम राहते.



